






# कृषक ज्ञान विज्ञान मंडपम् आणि महिलांसाठी तंत्रज्ञान पार्कचे लोकार्पण

## नैसर्गिक शेतीसाठी राज्य आणि केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी : केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चव्हाण

■ **नंदुरबार । प्रतिनिधी**

तालुक्यातील कोळदे येथील डॉ. हेडगेवार सेवा समितीचे कृषि विज्ञान केंद्र, आणि राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग, महाराष्ट्र द्वारे सिलेज आधारित परिसर विकास कार्यक्रम (उउझ) अंतर्गत उभारण्यात आलेल्या कृषक ज्ञान विज्ञान मंडपम् आणि महिलांसाठी तंत्रज्ञान पार्क या वास्तूंचा लोकार्पण केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान, दर्जेदार अन्न निर्मितीसाठी शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन आणि प्रशिक्षण मिळाले तर देशातील प्रत्येक गाव स्वावलंबी बनेल आणि गरीबीमुक्त होईल. त्यासाठी सरकार सोबत जनतेचा पुढाकार आवश्यक आहे. तसेच नैसर्गिक शेतीसाठी केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे प्रतिपादन केंद्रीय कृषि, शेतकरी कल्याण मंत्री तथा ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चव्हाण यांनी केले आहे.

यावेळी कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर, माजी मंत्री डॉ. विजयकुमार गावित, आ.चंद्रकांत रघुवंशी, आ. आमाश्या पाडवी, आ. राजेश पाडवी, कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगांवचे कुलगुरु डॉ. विजय माहेश्वरी, जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, एमसीआरसीएम मुंबईचे कार्यकारी अधिकारी निलेश सागर, जिल्हा पोलीस अधिक्षक श्रवण दत्त, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सावन कुमार, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अ.भा. कार्यकारीणी सदस्य वी. भागय्याजी, भा.कृ.अ.नु.प.अटारी पुण्याचे संचालक डॉ. एस.के. रॉय, योजक (पुणे) चे अध्यक्ष डॉ. गजानन डांगे, राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाचे सदस्य सचिव डॉ. एन.जी. शहा, डॉ. हेडगेवार सेवा समिती अध्यक्ष केदारनाथ कवडीवाले, सचिव डॉ, नितीन पंचभाई, कृषि विज्ञान केद्र प्रमुख राजेंद्र दहातोंडे, कोळदाचे सरपंच श्रीमती मोहिनी वळवी आदि यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना केंद्रीय कृषिमंत्री मंत्री ना.चव्हाण म्हणाले, शेतकऱ्यांच्या आजच्या कार्यक्रमासाठी मी प्रमुख अतिथी नसून एक सेवक म्हणून उपस्थित आहे, एक शेतकऱ्यांच्या परिवारातील सदस्य म्हणून या डॉ. हेडगेवार सेवा समितीच्या कृषी विज्ञान केंद्रात मला उपस्थित राहण्याची संधी मिळाली. त्यामुळे मी स्वत:ला भाग्यशाली समजतो. लोकशाहीत इकडे आणि जनता तिकडे असे चालत नाही, तशाने कामही होत नाही. जोपर्यंत दोघे मिळून एकत्र येत नाहीत तोपर्यंत विकास शक्य नाही. मला कल्पना आहे, येथील लोक मागणारे नाहित, झुकणारेही नाहीत, थेट निधड्या छातीने, आत्मविश्वासाने पुढे जाणारे आहेत. फक्त त्यांना गरज योग्य मार्गदर्शनाची.

ना. चव्हाण पुढे म्हणाले, जेव्हा अमेरिकेसारख्या युरोपियन देशांचा जन्मही झाला नव्हता, तेव्हा जगभरात लोक झाडांची साल आणि पाने शरीराला गुंडाळून झाकत होते. तेव्हा भारताच्या ढाक्क्यात रेशीम वस्त्र बनत होते. तंत्रविज्ञानाच्या जोरावर पोलाद बनवून जगभरात निर्यात केले जात होते. अनादीकाळापासून येथील आदिवासी बांधव आपल्या शेतीची औजारे स्वत: बनवत होते, स्वावलंबी होते. आज याच बांधवांना थोडे कौशल्याचे शिक्षण आणि मार्गदर्शन लाभले तर ते संपूर्ण मानवी समुदायाला समृद्ध करू शकतात. आणि असे शिक्षण आणि मार्गदर्शनाचे काम या कृषि विज्ञान केंद्रात सुरू आहे, हे काम म्हणजे समाजाला उभे करण्याचे महान कार्य आहे.

ते पुढे म्हणाले, आपण खूप नाही पण कमीतकमी क्षेत्रात कमीतकमी काय करू शकतो, यावर सर्वांनी विचार करण्याची गरज आहे. संपूर्ण जिल्ह्यात नाही पण काही गावातील काही एकर मर्यादित क्षेत्रात नैसर्गिक शेती करून किटकनाशकमुक्त, कॅन्सरमुक्त शेतीला चालना द्यायला हवी. त्यामुळे जमीनीचे आरोग्य टिकून राहील आणि उत्पादकताही वाढेल. नैसर्गिक शेतीसाठी भारत सरकार शेतकऱ्यांना सदैव प्रोत्साहन देत असून त्यासाठी लागणाऱ्या प्रयोग व औजारांसाठी केंद्र सरकार प्रति एकर रुपये ४ हजारांचे सहाय्य करते आहे. भविष्यात ते कायम राहील याची मी ग्वाही देत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. रहिमन पानी राखिए, बिन पानी सब सून। या हिंदी दोह्याचा संदर्भ देत मंत्री ना.चव्हाण म्हणाले, आपले प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणतात, ङ्कॅश द रेनफ म्हणजे पावसाचा वाहून जाणारा प्रत्येक थेंब जमिनीत कसा मुरवता येईल, यासाठी उपाययोजना करायला हव्यात. मनरेगाच्या माध्यमातून त्यासाठी आत्ताच कामे हाती घ्यायला हवीत. त्यासाठी कुठल्याही प्रकारच्या निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. तापी नदीच्या उपलब्ध पाण्याचा वापर शेतीसाठी करायला हवा. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतून तुषार सिंचनाचे प्रयोग करून शेतात पाणी मुरवता येऊ शकेल.

कृषि विज्ञान केंद्राच्या माध्यमातून येथील महिलांनी भगरीपासून बिस्किटे बनवली आहेत, दाळीवर प्रक्रिया करणारी यंत्रे विकसित केली आहेत. आज अशाच छोट्या थोड्या-छोट्या प्रयोगांमधून देशात सुमारे १ कोटी ४८ लाख महिला लखपती दिदी झाल्या आहेत. आज देशातील महिला आपल्या पायावर उभ्या राहून शेती आणि मातीचे विज्ञान शिकून शेती प्रक्रिया उद्योग मोठ्या दिमाखाने चालवत आहेत. येणाऱ्या काळात शेतकरी आणि ग्राहक यांच्यातील अंतर कमी करून दोघांच्या फायद्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार कटिबद्ध असल्याचे यावेळी केंद्रीय मंत्री चव्हाण यांनी सांगितले. ते म्हणाले, मोठ्या शहरांमध्ये शेतमाल विक्रीसाठी लागणारा वाहतूक खर्च केंद्र सरकार करण्याच्या विचारात आहे. विश्वकर्मा सारख्या योजनेत गाव-ातील विविध पारंपरिक व्यवसाय करणाऱ्यांचे सर्वेक्षण करा, प्रशिक्षण द्या, त्यांना सविधा द्या, गाव स्वावलंबी आणि गरीबीमुक्त करा. ही योजना आपल्या जिल्ह्यात राबवून आपले गाव, जिल्हा आदर्श बनविण्यासाठी आपल्या सर्वांना पुढे यावे लागेल असेही केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चव्हाण यांनी यावेळी सांगितले.

**शाश्वत शेतीच्या विकासासाठी शासन सर्वोतोपरी मदत करणारः ना.कोकाटे**

देशातील ७० टक्के लोकांचा व्यवसाय शेतीवर आधारित आहे. शेती हा अत्यंत गुंतागुतीचा विषय असून शाश्वत शेतीशिवाय शेतकरी त्यात रमत नाही. शेती व्यवसायातून स्थलांतरित होण्याची मानसिकता मोठ्या प्रमाणात असताना कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून शेती आणि शेतकऱ्यांच्या विकासासाठी सुरू असलेले प्रयत्न नक्कीच शाश्वत शेतीतून या भागाचा कायापालट केल्याशिवाय राहणार नाही. अशा या शाश्वत शेतीच्या प्रयत्नांसाठी शासन सर्वतोपरी मदत करेल असे यावेळी राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ड. माणिकराव कोकाटे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले.

यावेळी शेतकरी मेळावा, बचत गटांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात पुण्यातील योजक संस्थेचे अध्यक्ष डॉ. गजानन डांगे यांच्या पुस्तकांचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# विविध अपघातात दोन ठार, एक जण जखमी

■ **धुळे । प्रतिनिधी**

धुळे व साक्री तालुक्यात झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात दोन जण ठार तर एक जण जखमी झाला आहे.

शरद विनायक अहिरे (वय २७ रा. जुनवणे ता. धुळे) हे आपल्या भावासोबत एमएच १८ सीएफ ५५९० क्रमांकाच्या दुचाकीने जुनवणे येथे जात होते. त्यादरम्यान त्यांना बोरविहीर टोल नाक्याच्या पुढे हिंगलाज पेट्रोल पंपासमोर रस्त्यावर मागून भरधाव वेगाने येणाऱ्या एमएच २० बीसी ११४० क्रमांकाच्या धडक दिली.

या अपघातात शरद अहिरे यांचा मृत्यू झाला असून मोटारसायकलचेही नुकसान झाले आहे. याबाबत धर्मराज विनायक अहिरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संबंधित कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस हवालदार सोनवणे हे करीत आहेत.

तसेच दुसरा अपघात पिंपळनेर-नवापूर रस्त्यावर झाला. पानखेडा गावातून पिंपळनेर शहरात येत असलेल्या दुचाकीस्वारांना भरधाव पिकअप वाहनाने समोरून धडक दिली. या अपघातात सतीलाल गमन सोनवणे (वय ३५) यांचा मृत्यू झाला.

तर ज्ञानेश्वर गुलाब ठाकरे (वय ३४ रा.गव्हाणीपाडा पो.देगाव ता. साक्री) हे गंभीर जखमी झाले आहेत. हे दोघे एमएच १८ बीजे २६०७ क्रमांकाच्या दुचाकीने पिंपळनेर-नवापूर हायवेने जात असताना अनिरुद्ध लॉन्सच्या अलीकडे त्यांच्या दुचाकीला एमएच ४१ सी ०१९२ या क्रमांकाच्या पिकअप वाहनाने जोरदार धडक दिली. वाहनचालकाने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवत परिस्थितीकडे दुर्लक्ष केले. अपघातानंतर पिकअप चालक घटनास्थळावरून फरार झाला. याबाबत रामदास बळीराम पवार (रा. पानखेडा ता.साक्री) यांच्या फिर्यादीनुसार पिकअप चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोसई शेवाळे करत आहेत.

पान १ वरुन ...

## सारे काही शांत झोपेसाठी

गरज पडते असे नाही. शांत आणि गाढ झोपेसाठी तज्ज्ञ खूप सोपे सोपे उपाय सुचवतात. जे अंमलात आणले जाऊ शकतील. बुद्धिमत्ता, विचारक्षमता आणि तर्कशक्ती माणसाला प्राणिसृष्टीपेक्षा वेगळे ठरवते. म्हणजेच माणूस विचार करु शकतो. तर्क लावू शकतो. एखाद्या गोष्टीमागचा कार्यकारणभाव जाणून घेऊ शकतो. याच गुणांचा वापर त्याने अशांत झोपेची कारणे शोधण्यासाठी करण्याची गरज आहे. त्याच्या आधारे स्वत:चे झोपेचे चक्र का बिघडले? हे त्याच्या लक्षात येऊ शकेल. समस्येची कारणे समजून घेतली तर उपाययोजना करणे सोपे जाऊ शकेल.

## मंगेशकर रुग्णालयातील डॉ.घैसासांचा राजीनामा

राजीनामा देणे पसंत केले. राजीनाम्याच्या पत्रात त्यांनी नमूद केले आहे की, या संपूर्ण प्रकरणामुळे रुग्णालयाच्या नावलौकिकावर गालबोट लागत असून, माझ्या उपस्थितीमुळे परिस्थिती अधिक बिघडण्याची शक्यता आहे. त्यामुळे मी स्वेच्छेने राजीनामा देत आहे. रुग्णसेवा हे माझे सर्वोच्च कर्तव्य असून, त्यात कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, हीच माझी भूमिका आहे.

## वक्फ सुधारणा विधेयकाच्या प्रती फाडल्या

वक्फ विधेयक स्वीकार्य नसल्याने ते परत घ्या, अशा घोषणा दिल्या. यावरून सत्ताधारी आणि विरोधक आमने-सामने आल्याचे पाहायला मिळाले. तसेच पीडीपी प्रमुख मेहबूबा मुफ्ती यांनी स्थगन प्रस्ताव नाकारण्याच्या निर्णयाला निराशाजनक म्हटले. तसेच बहुमत असूनही एनसी-काँग्रेस युती भाजपाच्या मुस्लिमविरोधी अजेंड्यापुढे पूर्णपणे झुकली असल्याची टीका मेहबूबा मुफ्ती यांनी केली.

### कल्याण

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| १७-०२ २०२५ २२-०२-२०२५ | २५५ २१ १३७ | ४७० १९ ९०० | २४७ ३३ ७८८ | ३९९ १७ १७९ | २६९ ७६ ५५६ | २२४ ८४ ४५५ |
| २४-०२ २०२५ ०१-०३-२०२५ | ४४७ ५७ २६९ | ३६७ ६५ २६७ | १३६ ०६ ४५७ | १८० ९७ १७९ | २७० ९३ ३३७ | ६९० ५३ १२० |
| ०३-०३ २०२५ ०८-०३-२०२५ | ७७८ २१ ५८८ | ४६० ०१ ६६९ | ५५८ ८० ६७७ | ३०० ३९ २८९ | १२९ २० ४६० | ३७० ०१ १२८ |
| १०-०३ २०२५ १५-०३-२०२५ | ७८९ ४९ ५६८ | १२५ ८९ ४६९ | ३६९ ८३ १५७ | १५६ २९ १८० | ● | १३० ४४ ७८९ |
| १७-०३ २०२५ २२-०३-२०२५ | ५५८ ८२ ७७८ | २४४ ०१ २९० | ५७९ १४ ३४७ | १२० ३३ ७८८ | १६० ७० ६७७ | ८८० ६६ २७७ |
| १७-०३ २०२५ २२-०३-२०२५ | १११ ३३ १३९ | ६७७ ०० ३३४ | ४७० १० ५५० | ८९० ७९ २८९ | २५७ ३४ १५५ | २३४ ९६ ५५६ |
| ३१-०१ २०२५ ०५-०१-२०२५ | १२८ १२ ३३६ | ४६० ०४ ३५६ | ८८० ६६ ३६७ | १७८ ६१ ५६० | १६९ ६२ १३८ | २३५ ०२ ६७९ |
| ०७-०४ २०२५ १२-०४-२०२५ | १८० ९१ ५८८ | | | | | |

### मिलन डे

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १७-०२ २०२५ २२-०२-२०२५ | १३५ ९५ २५८ | १३० ४२ ६७९ | ३५० ८६ १७८ | ६७० ३७ २६९ | २३७ २३ १२० | ५७८ ०४ ६९९ | ● |
| २४-०२ २०२५ ०१-०३-२०२५ | २६६ ४७ ४५८ | ३५९ ७५ ४५६ | ६९० ५० ३८९ | २६७ ५९ ४६९ | ५६९ ०७ ३५९ | ३४० ७८ २६० | ● |
| ०३-०३ २०२५ ०८-०३-२०२५ | २४७ ३७ ६६८ | ११५ ७८ ४६८ | १३५ ९६ १२३ | २३० ५२ १५६ | ५७८ ०२ २३७ | २६० ८१ ४७० | ● |
| १०-०३ २०२५ १५-०३-२०२५ | २३९ ४४ २४८ | ६७८ १३ १४८ | ३४५ २९ १४४ | ७७० ४२ २५५ | ● | १४९ ४७ २७८ | ● |
| १७-०३ २०२५ २२-०३-२०२५ | १२० ३६ ११४ | ५७९ १२ ५८९ | ३८८ ९५ १७७ | १३८ २८ ४७७ | ३५९ ७९ १२६ | ५८८ १३ ६७० | ● |
| १७-०३ २०२५ २२-०३-२०२५ | १३८ २८ २६० | ७८८ ३७ २५० | ३४६ ३८ १७० | १६० ७१ ३८० | १४८ ३४ ३५६ | १४५ ०३ ६७० | ● |
| ३१-०१ २०२५ ०५-०१-२०२५ | ४५५ ४५ १५९ | ६७० ३६ ३६७ | २३६ १९ ४६९ | ६८८ २६ ४४८ | ८८९ ५४ ३५६ | १२० ३४ ५९० | ● |
| ०७-०४ २०२५ १२-०४-२०२५ | ३६६ ५१ २९० | | | | | | ● |

### मिलन नाईट

| सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|
| ११६ ८९ २३४ | १५९ ५७ १६० | २६० ८२ ५७० | २३८ ३६ ११४ | ३५८ ६२ ११० | ७८० ५२ ३९० |
| ३७० ०५ ४४७ | ३५८ ६३ २३८ | ५५६ ६५ २३० | २५० ७९ २७० | ३८८ ९४ ६९९ | ११८ ०३ २३८ |
| १२६ ९५ ४५६ | १२४ ७० २४४ | ३३० ६७ ८९० | ५७८ ०९ ३७९ | २३७ २६ ६०० | ३६९ ८९ ५६८ |
| ४६७ ७८ ४५९ | ४५८ ७८ ४७७ | ३७९ ९३ ३४६ | ३४९ ६९ ३७९ | ● | ४९० ३१ १४६ |
| ४६७ ७७ २६९ | ११३ ५१ ३८० | ५५८ ८२ १५६ | ४४० ८९ २७० | ४५६ ५५ ४५६ | १२५ ८५ १६८ |
| २९९ ०२ ३४५ | १९९ ९० ३७० | ११२ ४६ ३४९ | १३८ २१ ५६० | ३४५ २३ १३९ | ११६ ८८ ३५० |
| २४७ ३७ १७९ | ६९० ५१ १३७ | ३३७ ३३ २४७ | १२० ३७ ४४९ | २०० २३ २४७ | २६० ८४ २३९ |
| | | | | | |

**सोमवार ०६/०४/२०२५**
मेन बाजार -१३४-८२-४९९
मिलन ना.-२६०-८४-२३९

**मंगळवार ०७/०४/२०२५**
मेन बाजार -
कल्याण-१८०-९१-५८८
मिलन डे -३६६-५१-२९०
मिलन ना.-

### नशिबाची परीक्षा

मंगळवार ०८/०४/२०२५

*** मिलन डे ***
१४० २३० ७८० **५-९** १२६ ४५० १४४ | सिंगल ५-३-८
जोड ५१-७९-४३-८६-९२

*** कल्याण बाजार ***
१४९ २४८ ४४६ **४-७** १२४ ४६७ ७०० | सिंगल ४-२-६
जोड ४१-०७-२९-६८-७५

*** मुंबई (मेन) बाजार ***
१४६ १२८ ११९ **१-८** १७० १८९ ११६ | सिंगल १-३-७
जोड ८०-१२-५३-७६-८९

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे. कोणीही दुरुपयोग करु नये मो.९९७५४७९८२६


# क्लासिफाईड

**जाहिरात छोटी किमया मोठी**

**पाहिजेत**

हेअर कटींग सलुन दुकान कामासाठी ट्रेन/अनट्रेन कारागीर पगारी व कमिशन बेसीसवर पाहीजेत. न्हावी समाजाच्या गरिब व होतकरु मुलांना न्हावी या व्यवसायाचे प्रशिक्षण बेसीक पासुन ते प्रोफेशनल सलुन डिप्लोमापर्यन्त मोफत दिले जाईल. तसेच जळगाव व्यतिरिक्त बाहेर गावाच्या मुलांना राहण्याची व जेवनाची व्यवस्था मोफत आहे. फॅमिलीसह राहणाऱ्यांसाठी रुम उपलब्ध आहेत. संपर्क : ९४२३१८५१५६, ९५७९०७४२९९ (सीएम-३९६२१९ दि.२९/३/२५)

**खरेदी विक्री**

जळगाव शहर परिसरात व जिल्ह्यात, प्लॉट, शेत, फ्लॅट, दुकान, घर, बंगला इ. खरेदी विक्रीसाठी व भाड्याने देणे घेण्यासाठी विश्वासनीय ठिकाण स्वामीकृपा ईस्टेट ब्रोकर जळगाव. आमच्याकडे सुंदर लोकेशन व दर्जेदार क्वॉलिटीचे बांधकाम असलेले गच्चीताबा बंगलोज, स्वस्त भावाच्या, जिरायत, बागायत, रोडटच, एन.ए. झोन शेतजमिनी विकणे आहेत. संपर्क : ९४२३१८५१५६, ९५७९०७४२९९ (सीएम-३९६२१९ दि.२९/३/२५)

**दारुबंदीचा गुरुमंत्र**

द ग्रेट साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करु... पेशंटला सांगा....।। नका सांगू.... पेशंटला आणा.... ।। नका आणू.... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासुन १०० टक्के मुक्ती.... सर्व सुविधांनी परिपूर्ण:- * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इजंक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर आजच संपर्क :- ९५५२६१९७५२. डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (६४६२/व्ही.एम./०९/०१/२६)(CRINV-2425JL/CRG00504)

**१००% व्यसनमुक्ती**

* गॅरंटीने सोडवा. दारु + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखु + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी.डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव मो.९५५२६१९७५२,www.drpalve nashamuktikendra.in १००% रिझल्ट. (६४६३/व्ही. एम./०९/०१/२६) (CRINV-2425JL/CRG00503)

**उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी**

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे. जुनाट संधीवात / चिकून गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मुळव्याध, एचआयव्ही, भुक लागत नाही?, वजन कमी? थकवा जाणवतोय?, LOW CD4 COUNT? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा - अहमदनगरचे सुप्रसिध्द डॉक्टर पालवे, वरणगाव मो.नं. ९५५२६१९७५२ (६४६४/व्ही. एम./ ०९/०१/२६) (CRINV-2425JL/CRG00505)

**देशदूत**

धुळे आवृत्तीसाठी छोट्या जाहिरातील रु.५/- प्रतीशब्दाप्रमाणे स्वीकारल्या जातील. शब्दाची किमान मर्यादा १५ व कमाल मर्यादा ४०. सतत तीन दिवस दिल्यास चौथ्या, पाचव्या व सहाव्या दिवशी विनामूल्य. जाहिरातीच्या मजकूर दै. 'देशदूत'च्या छोट्या जाहिरातीच्या फॉर्मवर सुबक अक्षरात लिहून दै. 'देशदूत', 'देशदूत कार्यालय' राणी मेडीकल शेजारी, ग.नं. ६ ,धुळे ४२४००१. संपर्क धुळे-२३७९१४ फॅक्स २३८९१४.

**सूचना**

वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची 'देशदूत' वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल 'देशदूत' वृत्तपत्र समुहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.